Exh.5

# श्रीरामपुर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डी.)

## यांचे कोर्टात....

रे.मु.नं.
/२०२५

श्री. भागा उर्फ भागवत रेवजी बाचकर
.....वादी

विरूध्द

मिराबाई तुळशीराम माने वगैरे
......प्रतिवादी

**<u>या कामी वादीतर्फे तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेसाठी विनंती अर्ज की,</u>**

१. वादीने प्रस्तुतचा दावा प्र.वादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. मिळकतीचे वर्णन :-डिस्ट्रीक अ.नगर व सब डिस्ट्रीक तालुका श्रीरामपुर पैकी मौजे वांगी बु।। येथील ग्रा.प.हद्दीतील शेतजमीन मिळकत गट नं. ६ पैकी, क्षेत्र ०२ हे. ४० आर + पो.ख.०० हे. ०२ आर, यांसी आकार रु. ३-६० पैसे यासी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे. येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखुन न ठेवता.

२. वादी हे प्र.वादीच्या वडीलांचे चुलते असून, वादी आणि प्र.वादी यांच्या मध्ये भावकीचे नाते असून, प्र.वादीच्या आजोबा हे वादीचे सख्खे भाऊ होते. दावा मिळकत ही वादी आणि त्यांचे सख्खे भाऊ रंभाजी रेवजी बाचकर या दोघांना सिलींग कायद्याच्या तरतुदीनुसार सरकारकडून मिळालेल्या होत्या. प्रस्तुत जमीन ही दोघा भावांची सामाईक मिळकत होती व आहे. वादी यांचे भाऊ रंभाजी रेवजी बाचकर यांचा दि. १३/०७/२०२५ रोजी निधन झाल्याने, त्यांना प्रस्तुत दाव्यात वादीपणात सामील करण्यात आलेले नाही. प्रस्तुत दावा हा जाहीर ठरावाचा असल्याने, दि. २/०२/२००० रोजी मंडळाधिकारी यांनी मंजुर केलेल्या फेरफार नं. १३१९ नुसार तसेच आरटीएस वाटप ३९०/१९९९ दि. १२/१०/१९९९ च्या मा.तहसिलदार साहेब म्हणजेच प्र.वादी नं. २ यांच्या

कार्यालयातील आदेश हा बेकायदेशीर असून, झालेले दावा मिळकतीचे हस्तांतरण हे फसवणुक करून, बनावट दस्ताऐवज तयार करून तयार केलेले असल्याने, ते बेकायदेशीर आहे, असा जाहीर ठराव प्र.वादीविरुध्द मागितलेला असल्याने, मयत रंभाजी बाचकर यांच्या वारसांचीही वादीप्रमाणेच मागणी असून, परंतु आज रोजी  सही करण्याकरीता येऊ न शकल्याने त्यांना प्र.वादीपणात सामील करण्यात आलेले आहे. त्यास प्र.वादी नं. ३ ते ६ असे आहेत.

३. दि. १२/१०/१९९९ च्या मा.तहसिलदार साहेब श्रीरामपूर यांच्या वाटप एस.आर. /३९०/९९ या आदेशाने दावा मिळकतीवरती फेरफार क्र. १३१९ हा दि. ७/०१/२००० च्या अर्जावरुन दि. २/०२/२००० रोजी मा.मंडळाधिकारी टाकळीभान यांनी मंजुर केलेला आहे. प्रस्तुतच्या तहसिलदार साहेब यांच्या आदेशाबाबत वादी यांचा मुलगा नानासाहेब यांनी मा.तहसिलदार साहेब यांच्याकडील प्रस्तुत प्रकरणाचे कागदपत्रे मिळविली असता, तसेच दावा मिळकत ही प्र.वादी नं १ यांच्या नावे कशी झाली, याबाबत माहिती घेतली असता, प्रस्तुतचे हस्तांतर प्र.वादी नं. १ आणि तिचे पती तुळशीराम यांनी वादी यांनी प्र.वादी नं. ३ ते ६ यांचे वडील यांना फसवून तसेच मा.तहसिलदार साहेब यांचेकडे बनावट व खोटे कागदपत्रे सादर करून फसवणूक करून स्वतःच्या नावे करून घेतलेली होती. मा.तहसिलदार साहेब यांच्या आदेशामध्ये उल्लेखीत वाटप अर्ज आजपर्यंत वादी यांनी प्र.वादी नं. ३ ते ६ यांच्या वडीलांनी कधीही दाखल केलेला नव्हता तसेच त्याबाबत वाटपपत्र तयार करण्यात आलेले नव्हते. परंतु त्यांचे मांजरी येथे परगावी कायम स्वरुपीचे वास्तव्य असल्याचा आणि अज्ञानपणाचा तसेच वादी आणि प्र.वादी नं. ३ ते ६ यांचे वडील रंभाजी यांचा मेंढपाळाचा व्यवसाय असल्याने, मेंढी चारण्याकरीता अनेक दिवस बाहेरगावी भटकंतीवर असल्याने, तसेच प्रस्तुत मिळकत ही

जिरायत स्वरुपाची असल्याने, या सर्व गोष्टींचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीचे सन १९९९ ते २००० साली बेकायदेशीररित्या हस्तांतर करण्यात आलेले आहे.

४. वाटप एस आर प्रकरणामध्ये आणि सोबत तुळशीराम माने यांच्या हस्ते सौ. मिराबाई रामदास बाचकर यांचेकरीता घेण्यात आलेला स्टॅम्प पेपरवर वादी तसेच त्यांचे भावाची कोठेही सही तसेच अंगठा, साक्षीदार, ओळख अशा कुठल्याही स्वरुपाची नोंद अथवा निशाणी नाही. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वाटपपत्रावर जोडण्यात आलेल्या स्टॅम्प पेपरवरती कि ज्याचा अनुक्रमांक ३५९९ किंमत १००/- रुपये आहे. अशा स्टॅम्प पेपरवरती स्टॅम्प पेपर खरेदी करतांना मिराबाई रामदास बाचकर या प्र.वादी नं. १ च्या माहेरीकडील नावाचा उल्लेख करण्यात आलेला असून, खाली बनावट वाटपपत्र तयार करण्यात आलेले आहे. त्यात प्र.वादी नं. १ यांच्या सासरकडील नाव नोंदविण्यात आलेले आहे. अशा नावाने वाटप केलेबाबत लेख लिहीण्यात आलेला आहे. प्रस्तुत लेखामध्ये खोटे कथन करण्यात आलेले आहे की, "भागा रेवजी बाचकर व रंभा रेवजी बाचकर यांनी त्यांचे नावावरील जमीन त्यांची मुलगी मिराबाई तुळशीराम माने यांना वाटप करून दिले " मुळात मिराबाई ही रामदास बाचकर म्हणजेच वादी यांच्या भावाचा मुलगा यांची मुलगी असून, वादी यांची नात्याने चुलत नात आहे. परंतु वादी यांना स्वतः वारस असतांना अशा प्रकारचे वाटप बेकायदेशीर असल्याने, प्रस्तुत वाटपपत्रामध्ये प्र.वादी नं. १ हिस वादी यांची मुलगी भासविण्यात येवून, तसे असल्याचे दर्शवून खोट्या स्वरुपाचा मथळा लिहून तहसिलदार साहेब यांचेसमोर दाखल करण्यात आलेला आहे.

५. मा.तहसिलदार साहेब यांचे जमीन महसुल अधिनियमचे कलम ८५ च्या तसेच जमीन महसुल खात्याचे वाटप नियम ३ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या वाटप

प्रकरणात नमुद असलेल्या शर्तींचे पालन करण्यात आलेले नाही. शर्त क्र. १ मध्ये प्रस्तुत दावा मिळकत ज्या वर्गांतील आहे, त्यात असलेल्या शर्ती नुसार वाटप करणे गरजेचे असते. तसे झालेले नाही. तसेच दावा मिळकतीवर इतर हक्कांमध्ये जे जे बंधन व नियंत्रण वाटपाचे वेळी असेल त्याचे पालन झालेले नाही. प्रस्तुत वाटपात सिलींग कायद्याचे तरतुदीस बाधा निर्माण झालेली आहे आणि सदर वाटपास वादी व त्यांच्या भावाच्या वारसांनी कधीही समंती दिलेली नव्हती व नाही. तसेच वादी आणि वादीचा मयत भाऊ हे कधीही वांगी बु।। ता.श्रीरामपूर येथील कायम स्वरुपीचे रहीवासी नसून, मौजे मांजरी, ता.राहुरी येथील रहीवासी होते व आहेत. परंतु जमीन महसुल अधिनियम कलम ८५ नुसार वाटपाने नोटीस खोट्या व बनावट पट्टयावरती बजावण्यात अथवा प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने अशा प्रकारच्या वाटपपत्रासंदर्भात किंवा केस संदर्भात वादी यांना आजपर्यंत नमुद प्रकरणातील कागदपत्रे मिळेपर्यंत माहिती झालेली नव्हती. अशा प्रकारे प्र.वादी नं. १ यांनी बनावट वाटप पत्र तयार करून महसुली अधिकारी तसेच मा. तहसिलदार साहेब प्र.वादी नं. २ आणि वादी या सर्वांची फसवणुक करून प्रस्तुतची दावा मिळकत स्वतःचे नावे करून घेतलेली आहे. त्याबाबतचे दि. २०/११/२०२५ रोजी वादी यांच्या मुलाने श्रीरामपूर येथील तहसिलदार कार्यालय येथे चौकशी केली असता, वडीलांच्या अज्ञानपणाचा आणि आडाणीपणाचा गैरफायदा घेवून वादी यांची परगावी असलेली दावा मिळकतीवर बनावट कागदपत्रे दाखल करून व फसवणुक करून मिळकत स्वतःचे नावे करून घेतल्याची माहिती व दस्तऐवज प्राप्त झालेनंतर, वादी यांनी प्र.वादी यांना विचारपूस केली असता, त्यानी "प्रस्तुत मिळकत परत देणार नाही तसेच आम्ही त्रयस्थास विकु किंवा त्याचे वाटेल तसा उपभोग घेऊ, " अशी भाषा वापरली. सदरचे दावा मिळकतीचे हस्तांतर हे बेकायदेशीर असून त्याबाबत रेकॉर्ड ऑफ राईटला झालेली फेरफार

नं. १३१९ ची नोंद ही सुध्दा बेकायदेशीर आहे, असा जाहीर ठराव, आणि प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपावेतो प्र.वादी नं. १ हे दावा मिळकतीची त्रयस्तास हस्तांतर अथवा लिज, लिन,गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज बोजे निर्माण करून इतर हक्क प्रस्थापित करू शकतात त्यामुळे त्यांचेविरुध्द निरंतर व तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील आव्हानीत केलेला मा.तहसिलदार साहेब यांचा आदेश आणि फेरफार १९९९ ते २००० सालचा असूनही त्यास अनेक वर्षे झालेले असतांनाही प्रस्तुतचे झालेले हस्तांतर हे फसवून आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे तयार करण्यात आलेले आहे. याची माहिती वादीस नजीकच्या दिवसात झाली असल्याने, आणि वादीने प्रस्तुत हस्तांतर हे बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठरावाने मागितलेले असल्याने, नमुद दाव्यास लिमीटेशनची बाधा येत नसून, माहिती मिळताच मुदतीत दाखल केलेला आहे. वादीस प्रायमाफेसी केस असून, बॅलन्स ऑफ कन्व्हेनियन्स वादीचे बाजुने आहे.

६. तरी वादीची विंनती की,

प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपावेतो प्र.वादी नं. १ हे दावा मिळकतीची त्रयस्तास हस्तांतर अथवा लिज, लिन,गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज बोजे निर्माण करून इतर हक्क प्रस्थापित करू शकतात त्यामुळे त्यांचेविरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकुम प्र.वादी नं. १ विरुध्द देवविण्यात यावा.

सोबत ॲफिडेव्हीट दिले असे

**श्रीरामपूर**

**दिनांकः२४/१२/२०२५**

वादी

वादीतर्फे ॲडव्होकेट

Exh.6

# श्रीरामपुर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डी.)

## यांचे कोर्टात....

रे.मु.नं.
/२०२५

श्री. भागा उर्फ भागवत रेवजी बाचकर
.....वादी

विरूध्द

मिराबाई तुळशीराम माने वगैरे
......प्रतिवादी

ॲफिडेव्हीट

या कामी मी **श्री. भागा उर्फ भागवत रेवजी बाचकर** ,वयः-७९ धंदा :- काहीनाही रा.मांजरी,ता. राहुरी,जि. अहिल्यानगर कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करीतो की,

१. वादीने प्रस्तुतचा दावा प्र.वादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. मिळकतीचे वर्णन :-डिस्ट्रीक अ.नगर व सब डिस्ट्रीक तालुका श्रीरामपुर पैकी मौजे वांगी बु।। येथील ग्रा.प.हद्दीतील शेतजमीन मिळकत गट नं. ६ पैकी, क्षेत्र ०२ हे. ४० आर + पो.ख.०० हे. ०२ आर, यांसी आकार रु. ३-६० पैसे यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखुन न ठेवता.

२. वादी हे प्र.वादीच्या वडीलांचे चुलते असून, वादी आणि प्र.वादी यांच्या मध्ये भावकीचे नाते असून, प्र.वादीच्या आजोबा हे वादीचे सख्खे भाऊ होते. दावा मिळकत ही वादी आणि त्यांचे सख्खे भाऊ रंभाजी रेवजी बाचकर या दोघांना सिलींग कायद्याच्या तरतुदीनुसार सरकारकडून मिळालेल्या होत्या. प्रस्तुत जमीन ही दोघा भावांची सामाईक मिळकत होती व आहे. वादी यांचे भाऊ रंभाजी रेवजी बाचकर यांचा दि. १३/०७/२०२५ रोजी निधन झाल्याने, त्यांना प्रस्तुत दाव्यात वादीपणात सामील करण्यात आलेले नाही. प्रस्तुत दावा हा जाहीर ठरावाचा असल्याने, दि. २/०२/२००० रोजी मंडळाधिकारी यांनी मंजुर

Order
Filed.

SANDEEP GANGADHARRAO SARODE
Digitally signed by SANDEEP GANGADHARRAO SARODE
Date: 2026.01.06 17:51:27 +0530

Jt.CJSD
Shrirampur
Dt.06.01.2026

9/1/25
Superintendent
Civil Court, S.D.Shrirampur

केलेल्या फेरफार नं. १३१९ नुसार तसेच आरटीएस वाटप ३९०/१९९९ दि. १२/१०/१९९९ च्या मा.तहसिलदार साहेब म्हणजेच प्र.वादी नं. २ यांच्या कार्यालयातील आदेश हा बेकायदेशीर असून, झालेले दावा मिळकतीचे हस्तांतरण हे फसवणुक करून, बनावट दस्ताऐवज तयार करून तयार केलेले असल्याने, ते बेकायदेशीर आहे, असा जाहीर ठराव प्र.वादीविरुध्द मागितलेला असल्याने, मयत रंभाजी बाचकर यांच्या वारसांचीही वादीप्रमाणेच मागणी असून, परंतु आज रोजी सही करण्याकरीता येऊ न शकल्याने त्यांना प्र.वादीपणात सामील करण्यात आलेले आहे. त्यास प्र.वादी नं. ३ ते ६ असे आहेत.

३. दि. १२/१०/१९९९ च्या मा.तहसिलदार साहेब श्रीरामपूर यांच्या वाटप एस.आर. /३९०/९९ या आदेशाने दावा मिळकतीवरती फेरफार क्र. १३१९ हा दि. ७/०१/२००० च्या अर्जावरुन दि. २/०२/२००० रोजी मा.मंडळाधिकारी टाकळीभान यांनी मंजुर केलेला आहे. प्रस्तुतच्या तहसिलदार साहेब यांच्या आदेशाबाबत वादी यांचा मुलगा नानासाहेब यांनी मा.तहसिलदार साहेब यांच्याकडील प्रस्तुत प्रकरणाचे कागदपत्रे मिळविली असता, तसेच दावा मिळकत ही प्र.वादी नं १ यांच्या नावे कशी झाली, याबाबत माहिती घेतली असता, प्रस्तुतचे हस्तांतर प्र.वादी नं. १ आणि तिचे पती तुळशीराम यांनी वादी यांनी प्र.वादी नं. ३ ते ६ यांचे वडील यांना फसवून तसेच मा.तहसिलदार साहेब यांचेकडे बनावट व खोटे कागदपत्रे सादर करून फसवणूक करून स्वतःच्या नावे करून घेतलेली होती. मा.तहसिलदार साहेब यांच्या आदेशामध्ये उल्लेखीत वाटप अर्ज आजपर्यंत वादी यांनी प्र.वादी नं. ३ ते ६ यांच्या वडीलांनी कधीही दाखल केलेला नव्हता तसेच त्याबाबत वाटपपत्र तयार करण्यात आलेले नव्हते. परंतु त्यांचे मांजरी येथे परगावी कायम स्वरुपीचे वास्तव्य असल्याचा आणि अज्ञानपणाचा तसेच वादी आणि प्र.वादी नं. ३ ते ६

Superintendent Civil Court, S.D.

यांचे वडील रंभाजी यांचा मेंढपाळाचा व्यवसाय असल्याने, मेंढी चारण्याकरीता अनेक दिवस बाहेरगावी भटकंतीवर असल्याने, तसेच प्रस्तुत मिळकत ही जिरायत स्वरुपाची असल्याने, या सर्व गोष्टींचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीचे सन १९९९ ते २००० साली बेकायदेशीररित्या हस्तांतर करण्यात आलेले आहे.

४. वाटप एस आर प्रकरणामध्ये आणि सोबत तुळशीराम माने यांच्या हस्ते सौ. मिराबाई रामदास बाचकर यांचेकरीता घेण्यात आलेला स्टॅम्प पेपरवर वादी तसेच त्यांचे भावाची कोठेही सही तसेच अंगठा, साक्षीदार, ओळख अशा कुठल्याही स्वरुपाची नोंद अथवा निशाणी नाही. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वाटपपत्रावर जोडण्यात आलेल्या स्टॅम्प पेपरवरती कि ज्याचा अनुक्रमांक ३५९९ किंमत १००/- रुपये आहे. अशा स्टॅम्प पेपरवरती स्टॅम्प पेपर खरेदी करतांना मिराबाई रामदास बाचकर या प्र.वादी नं. १ च्या माहेरीकडील नावाचा उल्लेख करण्यात आलेला असून, खाली बनावट वाटपपत्र तयार करण्यात आलेले आहे. त्यात प्र.वादी नं. १ यांच्या सासरकडील नाव नोंदविण्यात आलेले आहे. अशा नावाने वाटप केलेबाबत लेख लिहीण्यात आलेला आहे. प्रस्तुत लेखामध्ये खोटे कथन करण्यात आलेले आहे की, "भागा रेवजी बाचकर व रंभा रेवजी बाचकर यांनी त्यांचे नावावरील जमीन त्यांची मुलगी मिराबाई तुळशीराम माने यांना वाटप करून दिले " मुळात मिराबाई ही रामदास बाचकर म्हणजेच वादी यांच्या भावाचा मुलगा यांची मुलगी असून, वादी यांची नात्याने चुलत नात आहे. परंतु वादी यांना स्वतः वारस असतांना अशा प्रकारचे वाटप बेकायदेशीर असल्याने, प्रस्तुत वाटपपत्रामध्ये प्र.वादी नं. १ हिस वादी यांची मुलगी भासविण्यात येवून, तसे असल्याचे दर्शवून खोट्या स्वरुपाचा मथळा लिहून तहसिलदार साहेब यांचेसमोर दाखल करण्यात आलेला आहे.

endent
).Shrirampur

५. मा.तहसिलदार साहेब यांचे जमीन महसुल अधिनियमचे कलम ८५ च्या तसेच जमीन महसुल खात्याचे वाटप नियम ३ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या वाटप प्रकरणात नमुद असलेल्या शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही. शर्त क्र. १ मध्ये प्रस्तुत दावा मिळकत ज्या वर्गातील आहे, त्यात असलेल्या शर्ती नुसार वाटप करणे गरजेचे असते. तसे झालेले नाही. तसेच दावा मिळकतीवर इतर हक्कांमध्ये जे जे बंधन व नियंत्रण वाटपाचे वेळी असेल त्याचे पालन झालेले नाही. प्रस्तुत वाटपात सिलींग कायद्याचे तरतुदीस बाधा निर्माण झालेली आहे आणि सदर वाटपास वादी व त्यांच्या भावाच्या वारसांनी कधीही समंती दिलेली नव्हती व नाही. तसेच वादी आणि वादीचा मयत भाऊ हे कधीही वांगी बु।। ता.श्रीरामपूर येथील कायम स्वरुपीचे रहीवासी नसून, मौजे मांजरी, ता.राहुरी येथील रहीवासी होते व आहेत. परंतु जमीन महसुल अधिनियम कलम ८५ नुसार वाटपाने नोटीस खोट्या व बनावट पट्टयावरती बजावण्यात अथवा प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने अशा प्रकारच्या वाटपपत्रासंदर्भात किंवा केस संदर्भात वादी यांना आजपर्यंत नमुद प्रकरणातील कागदपत्रे मिळेपर्यंत माहिती झालेली नव्हती. अशा प्रकारे प्र.वादी नं. १ यांनी बनावट वाटप पत्र तयार करून महसुली अधिकारी तसेच मा. तहसिलदार साहेब प्र.वादी नं. २ आणि वादी या सर्वांची फसवणुक करून प्रस्तुतची दावा मिळकत स्वतःचे नावे करून घेतलेली आहे. त्याबाबतचे दि. २०/११/२०२५ रोजी वादी यांच्या मुलाने श्रीरामपूर येथील तहसिलदार कार्यालय येथे चौकशी केली असता, वडीलांच्या अज्ञानपणाचा आणि आडाणीपणाचा गैरफायदा घेवून वादी यांची परगावी असलेली दावा मिळकतीवर बनावट कागदपत्रे दाखल करून व फसवणुक करून मिळकत स्वतःचे नावे करून घेतल्याची माहिती व दस्तऐवज प्राप्त झालेनंतर वादी यांनी प्र.वादी यांना विचारपूस केली असता, त्यानी "प्रस्तुत मिळकत परत देणार नाही तसेच आम्ही त्रयस्थास विकु किंवा त्याचे

Superintendent Civil Court, S.D

वाटेल तसा उपभोग घेऊ, " अशी भाषा वापरली. सदरचे दावा मिळकतीचे हस्तांतर हे बेकायदेशीर असून त्याबाबत रेकॉर्ड ऑफ राईटला झालेली फेरफार नं. १३११ ची नोंद ही सुध्दा बेकायदेशीर आहे, असा जाहीर ठराव, आणि प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपावेतो प्र.वादी नं. १ हे दावा मिळकतीची त्रयस्तास हस्तांतर अथवा लिज, लिन,गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज बोजे निर्माण करून इतर हक्क प्रस्थापित करू शकतात त्यामुळे त्यांचेविरुध्द निरंतर व तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील आव्हानीत केलेला मा.तहसिलदार साहेब यांचा आदेश आणि फेरफार १९९९ ते २००० सालचा असूनही त्यास अनेक वर्षे झालेले असतांनाही प्रस्तुतचे झालेले हस्तांतर हे फसवून आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे तयार करण्यात आलेले आहे, याची माहिती वादीस नजीकच्या दिवसात झाली असल्याने, आणि वादीने प्रस्तुत हस्तांतर हे बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठरावाने मागितलेले असल्याने, नमुद दाव्यास लिमीटेशनची बाधा येत नसून, माहिती मिळताच मुदतीत दाखल केलेला आहे. वादीस प्रायमाफेसी केस असून, बॅलन्स ऑफ कन्व्हेनियन्स वादीचे बाजुने आहे.

६. तरी वादीची विंनती की,

प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपावेतो प्र.वादी नं. १ हे दावा मिळकतीची त्रयस्तास हस्तांतर अथवा लिज, लिन,गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज बोजे निर्माण करून इतर हक्क प्रस्थापित करू शकतात त्यामुळे त्यांचेविरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकुम प्र.वादी नं. १ विरुध्द देवविण्यात यावा.

हे ॲफिडेव्हीट दिले असे.

**श्रीरामपुर**

**दि:९/१२/२०२५**

**ओळख**

(Adv. A. S. [illegible])

**ॲफिडेव्हीट करणार**

ndent
.Shrirampur

## व्हेरिफिकेशन

या कामी मी **श्री. भागा उर्फ भागवत रेवजी बाचकर** ,वय:-७९ धंदा :- काहीनाही रा.मांजरी,ता. राहुरी,जि. अहिल्यानगर कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करीतो की, वरील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी श्रीरामपुर मुक्कामी याखाली माझी सही केली असे.

**श्रीरामपुर**

**दि:९/१२/२०२५**

Bbaamz

**ॲफिडेव्हीट करणारे**

Solemnly affirmed before me
by Shri Bhaga @ Bhagwat Revaji Bachakar.
Who is identified before me
by Adv. A.S. Tanjire Age 79, years
to Whom I Personally Know R/o. Manjari Rahuri
Tal. Rahuri Dist A.Nagar.

09/12/25

**Superintendent**
Civil Court, S.D.Shrirampur